ग्रं. सं.

त्यानें बक्षीस व लायब्र्यांकरितां मंजूर केलें आहे.

सुंदरची संक्रांत

१९६१



IRBK-0109316

किंमत १॥ आणा

सुंदरेची संक्रांत

महाराज, आपण मला साताऱ्याची वाट दाखवाल काय? [पृष्ठ-७

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

सुंदरची संक्रांत

संक्रांतीचा सण जवळ आला होता, आणि जेजुरी येथें घरोघरीं बायकांची त्यासंबंधाची कडेकोट तयारी चालली होती. चंद्राबाई सकाळपासून सारखी उभी होती. ती काम करकरून अगदीं थकून गेली होती. शिवाय तिच्या जिवालाही चैन नव्हतें. ती दुःखानें पोळली होती, व सुखाचा दिवस दृष्टीस पडण्याची तिला मुळींच आशा राहिली नव्हती.

तिला एक मुलगी होती; तिचें नांव सुंदरा असें होतें. ही मुलगी एक वर्षाची असेल नसेल, तोंच तिचा बाप वारला. त्याची आठवण त्या मुलीस मुळींच नव्हती. त्या वेळेस तीं माणसें पुण्यास राहत असत. परंतु नवरा मरून गेल्यावर चंद्राबाईचे फार हाल होऊं लागले. म्हणून चंद्राबाईची एक जिवलग मैत्रीण जेजुरीस राहत होती, ती आपल्याला कांहीं मदत करील अशा आशेवर ती आपल्या पोरक्या मुलीला घेऊन जेजुरीस गेली. तेथें तिनें आपल्या मैत्रिणीचा पुष्कळ शोध केला, परंतु कांहीं तपास लागला नाहीं. पुन्हा पुण्यास परत यावें, तरी पोटापाण्याची सोय नव्हतीच; म्हणून चंद्राबाई जेजुरीसच मोलमजुरी करून राहिली.

याप्रमाणें पांच वर्षें लोटलीं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत चंद्राबाईनें काबाडकष्ट करावे, आणि रात्रीं आपली एकुलती

एक मुलगी पोटाशीं धरून निजावें. मुलीला अर्थात् कांहींच कळत नव्हतें.

चंद्राबाई फार धार्मिक असे, व तिचा गुरुचरित्राचा पाठ वाचण्याचा नियम होता. आणि आपल्याप्रमाणें आपल्या मुलीसही पोथी वाचतां यावी, म्हणून तिनें सुंदरेस—म्हणजे त्या मुलीस—फावल्या वेळीं अक्षरओळख करून दिली होती.

एकमेकांच्या जिवाभावाला हे दोनच जीव होते. चंद्राबाईला सुंदरा जीव कीं प्राण होती. चंद्राबाई दिवसा कामधामांत गुंतलेली असे, तरीसुद्धा सुंदरा तिच्या मागून लुडबुडतच असे. रात्रीचीं तर तीं दोघें एकमेकांच्या गळ्यावर गळा ठेवून निजत.

एके दिवशीं रात्रीं चंद्राबाई सुंदरेस मोठमोठ्यानें हांका मारूं लागली. त्यामुळें सुंदरा दचकून जागी झाली.रात्रीची आई हांका कां मारते, हें तिला समजेना. सुंदरा जागी झाली तशी चंद्राबाई तिला म्हणाली, " सुंदरे, माझी बाळ, दिवा लाव बरं. "

सुंदरेनें दिवा लावला, परंतु आईचा शब्द रोजच्यासारखा येईना, म्हणून ती अगदीं घाबरून गेली. तिनें अंथरुणाजवळ दिवा आणला आणि आईचें तोंड न्याहाळून पाहिलें, तों तें निस्तेज झालें होतें. तें पाहून ती मोठ्या दुःखानें आईला म्हणाली, " आई, आई ? तुला काय ग होतंय् ?"

" माझी बाळ, माझ्या कुशींत ये ग ! भिऊं नको बाळ ! मला एक पापा दे बरं ! अस्सं. हें बघ, आतां मी तुला सांगतें.— बाळ मला देवाच्या घरचं बोलावणं आलं आहे. सुंदरे, मी आज रात्रीं मरणार ! "

सुंदरा ओक्साबोक्शीं रडूं लागली. मध्यरात्र उलटून गेली होती व जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालें होतें; आणि ही वापुडवाणी पोर एकटीच रडत होती. इकडे चंद्राबाईचा शब्द खोल खोल जात होता. तिला अंतकाळच्या वेदना होऊं लागल्या होत्या. तशा वेदनांतच तिनें मुलीला हांक मारली आणि म्हटलें, " बाळ, रडूं नको. तुझा वाली ईश्वर आहे. तो कधीं तुझी उपेक्षा करणार नाहीं. चिमण्यांच्या लहान पिलांची देखील तो जतन करतो. तो तुला अंतर देणार नाहीं. माझ्यामागं कोणी तरी तुला त्राता उभा राहील. माझी एक राधाबाई नांवाची मैत्रीण आहे, तिच्याविषयीं मी पुष्कळ वेळां तुजजवळ बोललें आहे. तिचा तपास कर. मला आज कित्येक वर्षांत तिच्याकडील समाचार कळला नाहीं. मी मागं दुखण्यानें पडले होतें, तेव्हां तिला मीं एक पत्र लिहिलं होतं, तें माझ्या गुरुचरित्राच्या पोथींत तसंच पडून राहिलं आहे. तुला राधाबाईचा कधींकाळीं शोध लागला, तर तें पत्र तूं तिजकडे पाठीव. ती तुजवर माझ्याप्रमाणंच ममता करील. विसरूं नको बरं."

" आई, मी नाहीं बरं विसरणार."

मग सर्व स्तब्ध झालें. हळूहळू चंद्राबाईचा श्वासोच्छ्वास ऐकूं येईनासा झाला. तिचें तोंड काळवंडलें. सुंदरेचें रडें आवरेनासें झालें, ती मोठ्यानें किंकाळ्या फोडूं लागली, आणि म्हणाली, " आई !—आई !—आतां मी काय ग करूं ? "

" माझी पिली, तूं कांहीं करूं नको. माझ्याजवळ ये आणि मला एक शेवटचा तुझा मुका दे बरं ! हे देवा ! हे परमेश्वरा ! ह्या पोरक्या पोरीचा सांभाळ तुजवांचून कोण करणार आहे ? "

इतकें बोलून ती स्तब्ध राहिली. तिची वाचा बसली आणि थोड्या वेळानें तिचा प्राण तिच्या कुडींतून निघून गेला.

सुंदरेला आतां कोणीच नाहींसें झालें, परंतु रमाबाई नांवाची एक श्रीमंत बायको होती, तिचीं मुलें संभाळण्यास तिला एक मुलगी ठेवावयाची होती. तिच्या घरीं सुंदरा चाकरीस राहिली.

त्या घरीं ती एक वर्षभर राहिली. तेथें तिनें पडेल तें काम करावें, व कोणीं रागें भरलें तरी तें निमूटपणें सोसावें. अशा रीतीनें काम करितां करितां ती अगदीं कंटाळून गेली. होतां होतां मकरसंक्रांतीचा दिवस जवळ आला. आणि पुढें जी गोष्ट आम्हीं सांगणार ती त्याच दिवशीं घडली. ती अशीः—

तिची धनीण रमाबाई तिला म्हणाली, " ए सुंदरे ! चिमणी ओटी झाडते आहे, तोंपर्यंत तूं बाळासाहेबाला दिवाणखान्यांत घेऊन जा. पण, संभाळ हो पोरी, तिथं त्याला कांहीं आवाडाव करूं देऊं नको ! "

सुंदरनें " जी बाईसाहेब ! " असें म्हणून मुलाला दिवाण-खान्यांत नेलें. परंतु तो मुलगा फार अचपळ होता, आणि सुंदरेला एक घटकाभर सारखा त्याच्यामागें खडा पहारा करावा लागला. सरशेवटीं तिनें त्या मुलाच्या हातांत एक चित्रांचें पुस्तक देऊन त्याला अंमळ नादीं लाविलें, आणि हळूच तिनें आपल्या ओच्यांतून एक पत्र काढिलें आणि त्यावर लिहिलेला पत्ता वाचूं लागली. आईनें आपल्या मैत्रिणीला जें पत्र दिलें होतें तेंच हें पत्र. त्याला ती कधींही विसंबली नव्हती. रात्रंदिवस तिनें तें आपल्या ओच्यांत बाळगलें होतें. " रा. रामदयाळसिंग, वकील, सातारा " एवढींच काय तीं त्या

पत्रावर अक्षरें लिहिलीं होतीं. सातारा कोठें असेल बरें ? आणि माझ्या आईच्या मैत्रिणीचा पत्ता रामदयाळ यांस ठाऊक असेल काय ? असा ती आपल्या मनांत विचार करीत आणि निराशेनें आकाशाकडे पहात उभी राहिली आहे, तों धाड्दिशीं कांहीं पडल्यासारखा आवाज झाला, आणि छोट्या बाळासाहेबांनीं एकदम किंकाळी फोडली ! त्याबरोबर सुंदरा धांवली, आणि पहाते तों मेजावरून बाईसाहेबांचा वेणीफणी करण्याचा आरसा जमिनीवर पडून त्याचे तुकडे तुकडे झालेले आहेत. सुंदरा इकडे आपल्या मनाशीं विचार करीत बसली होती, तोंच बाळा-साहेबानें मुकाट्यानें खुर्चीवर चढून मेजावरील आरसा खालीं ढकलला. त्याबरोबर तो खालीं पडला. तो मुलगा खुर्चीवर चढला केव्हां हें सुद्धा सुंदरेस समजलें नाहीं. शेजारच्या खोलींत मालकिणीची मुलगी यमुना बसली होती, तिनें आरसा पड-ल्याचा आवाज ऐकिला, आणि ती लागलीच धांवत आली, आणि म्हणाली, "सुंदरे, तुझ्यानं मुलाला सांभळवत नाहीं ना ? पाहा त्यानं काय केलं तें ! थांब, मी अशीच जाऊन आईला सांगतें हो." असें म्हणून ती निघून गेली. तिच्या पाठोपाठ बाईसाहेबांची स्वारी तडफडत तडफडत हातपाय आपटीतच दिवाणखान्यांत आली. "काय मुर्दाड विजवटी काटीं आहे ही ! अग ए, टवळे, बाळासाहेबाला खोड्या करूं देऊं नको, म्हणून मीं तुला बजावलं होतं ना ? आतां त्या सगळ्या कांचा गोळा कर आणि आपलं तोंड काळं कर ! तुझी मला गरज नाहीं ! चल निघ ! " असें म्हणत तिनें लाथाबुक्क्यांनीं सुंदरेला पुष्कळ मारलें आणि ती झण्कान्यानें तशीच दिवाणखान्यांतून निघून गेली.

यजमानीण रागें भरत होती, तोंवर सुंदरेनें एक चकार शब्द देखील तोंडांतून काढला नाहीं. परंतु तिचे डोळे पाण्यानें भरून आले. परंतु काय करते बिचारी ! तिनें बाळासाहेबाला तसेंच उचलून कडेवर घेतलें व खालीं नेऊन सोडलें, आणि मुकाट्यानें आपली घोंगडी आणि साडी-चोळी घेऊन ती घराबाहेर पडली.

" आतां एक घटकाभरसुद्धा मी या घरांत राहणार नाहीं. मी आपल्या आईच्या मैत्रिणीचा तपास लावीन तेव्हांच थांबेन." असा मनाचा निर्धार करून ती भराभर पावलें टाकीत निघाली. एखाद्या पक्ष्याला घरटें नसावें आणि तो वादळांत सांपडावा आणि मग निवाऱ्यासाठीं तो पक्षी जसा भराऱ्या मारतो तशी सुंदरा झपाट्यानें निघाली. तिनें सगळा गांव पालथा घातला, शेतें ओलांडलीं, आणि तडक स्टेशनाची वाट धरिली. स्टेशना-जवळ येते तों गाडींत दिवे वगैरे लागून गाडी सुटायची वेळ झाली होती. ती लवकर लवकर स्टेशनांत शिरली आणि तिनें तिकीट देणाराला विचारिलें, " महाराज, ही गाडी साताऱ्याला जाते काय ? " " मुली, ही गाडी थेट साताऱ्याला जात नाहीं, पण साताऱ्यापासून पांच कोसांवर जाते." " बरं तर, हें घ्या. एवढ्यानं तुमची भरती होईल असं वाटतं. " असें म्हणून तिनें आपलें जुगदान त्या कारकुनापुढें पालथें केलें. त्यानें त्या पिशवींतील कांहीं मोड परत केली, आणि ती जाऊं लागली, तेव्हां तो मोठ्या प्रसन्न मुद्रेनें तिजकडे पाहून हंसला. जिकडे तिकडे अंधार पडला होता, आणि थंडी तर मी मी म्हणत होती. सुंदरा एकदांची जाऊन गाडींत बसली. ती पूर्वीं कधींच गाडींत बसलेली नव्हती, म्हणून खिडकीशीं तोंड करून झाडें पळत होतीं त्यांजकडे ती सारखी पहात बसली.

होतां होतां, कांहीं वेळानें गाडी उभी राहिली, आणि "सातारकू जानेवाला कोई है ?" असें गाडीच्या बाहेर शिपाई पुकारूं लागला. त्याबरोबर कांहीं उतारू उतरले, आणि त्यांच्या मागून सुंदराही उतरली. बाकीचे सर्व वाटसरू आपआपल्या मार्गास लागले. सुंदरेला मात्र कोणीकडे जावयाचें व कसें जावयाचें, हें कांहींच समजेना. म्हणून ती एकटीच अंधारांत उभी राहिली.

आतां मात्र आपल्यास खरोखर कोणी एक नाहीं, आणि जेजुरी सोडून आलें नसतें तर बरें होतें, असें तिला वाटूं लागलें, आणि ती रडूं लागली. इतक्यांत एक म्हातारा मनुष्य हातांत कंदील घेऊन आला, आणि या मुलीला एकटी पाहून त्यानें विचारिलें, "कोण आहे तें ?" "महाराज, मला साताऱ्याला जावयाचें आहे. आपण कृपा करून मला वाट दाखवाल काय ?" "मुली, तुला साताऱ्याला जावयाचें आहे काय ? सातारा येथून पांच कोस होईल. तेथें आतां रात्रीची तूं कशी जाणार ?" "मग मी आतां कसें करूं ?" असें म्हणून ती स्फुंदूं लागली. "मुली तूं एकटीच आहेस काय ?"

"होय महाराज." "एवढी लहान मुलगी, आणि एवढ्या रात्रीची एकटी कशी बाहेर पडलीस ? बरें, ये माझ्याबरोबर, मी तुला निवाऱ्याची जागा निजावयास देतों, आणि सकाळीं तूं आपल्या वाटेला लाग." सुंदरा त्या म्हाताऱ्याचे मागून मोठ्या आनंदानें गेली. त्या दयाळू म्हाताऱ्यानें तिला थोडें खाऊं पिऊं घातलें, व अंथरूण पांघरूण देऊन तिला एका कोंपऱ्यांत निजावयास जागा दिली. तेथें तिला उजाडेपर्यंत गाढ झोंप लागली.

उजाडल्यावर, तोंड, हातपाय धुतल्यावर त्या म्हाताऱ्यानें त्या मुलीस न्याहारीकरितां थोडीशी दशमी दिली. तेवढी दशमी खाऊन सुंदरा जावयास निघाली. तेव्हां निघावयाच्या वेळीं तिनें रामदयाळसिंगाविषयीं त्या म्हाताऱ्याजवळ विचारपूस केली. म्हाताऱ्यानें, मीं मुळीं रामदयाळ हें नांव ऐकिलेंसुद्धां नाहीं, असें सांगितलें. मग त्या मुलीनें त्याला सातारचा रस्ता विचारिला. "मुली, येथून तीन कोसांवर सातारा आहे. पण लवकर पाऊल उचल हो. पहांटेपासून अंमळ आभाळ निघालें आहे. न जाणों, तुला मध्येंच पावसानें गांठलें, तर तुझी फार दुर्दशा होईल.

त्या दिवशीं वांबाळ पडली होती, गार वारा वहात होता, म्हणून सुंदरेनें आपली घोंगडी गुरफटून घेतली, आणि त्या म्हाताऱ्याच्या पायांवर डोकें ठेवून, आपली वाट धरली. थंडीचा कडाका पडला होता. वर आभाळांतही धामधूम चालली होती. वारा सोसाट्यानें वहात होता, आणि त्या-मुळें झाडांच्या फांद्यांतून सूं सूं असा आवाज चालला होता. आगगाडीची वेळ नसल्याकारणानें आणि शिवाय संक्रांतीचा सण असल्यामुळें वाटेनें कोणी माणूस फिरत नव्हतें. त्यामुळें सुंदरेचें काळीज थरथर कापूं लागलें. तिचे पायही चालून चालून थकले. परंतु ती तशीच नेट धरून पुढें चालली. दोन प्रहर उलटून गेले, आणि सातारा तर जवळ येईना. इतक्यांत एक गाडीवाला तिला भेटला. त्याला तिनें सातारा किती लांब आहे म्हणून विचारिलें. तो म्हणाला, "मुली, हें पाहा वडूथ. याच्या पलीकडे सातारा आहे." सुंदरा तशीच जीव मुठींत

धरून पुढें निघाली. आभाळ अगदीं भरून आलें, आणि आतां कोसळेल कीं काय असें वाटूं लागलें. चालून चालून तिचे पाय भरून आले, पोटास भूक लागली, आणि थंडी वाजूं लागली. तो संक्रांतीचा दिवस होता. आई जिवंत असतांना संक्रांतीचा दिवस किती सुखांत जात असे, याची तिला आठवण झाली, आणि तिच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले. वडूथ मागें राहिलें. दूर अंतरावर डोंगराच्या माचीला घरें असावीं, असें तिला वाटूं लागलें; इतक्यांत पावसानें गर्दी केली, वाऱ्यानें घोंगडीसुद्धा अंगावर राहीना; आणि ती अगदीं थकून एका लहानशा पुलाजवळ बसली. दूर अंतरावरून चौघड्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. आज सणाचा दिवस, सर्व जग आनंदांत आहे, मीच मात्र हतभागी संकटांत आहें, असें तिला वाटूं लागलें आणि तिचा धीर सुटला. आतां या पुलावरच आपला प्राण जाणार, असें तिला वाटलें. इतक्यांत तिच्या आईच्या शेवटच्या शब्दांची तिला आठवण झाली. "पक्ष्यांच्या लहान पिलांची जो जतन करितो तो तुझा सांभाळ करील." हे भक्तिभावाचे शब्द त्या लहान मुलीच्या शुद्ध अंतःकरणांत अगदीं ठसून गेले होते. या शब्दांची तिला आठवण झाली आणि तिला पुनः धीर आला. पावसाची संततधार चालली होती, पण ती तशीच पुढें निघाली. तो पूल ओलांडून ती पाव कोससुद्धां पुढें गेली नसेल, तों तिचे पाय अगदीं वळून गेले आणि ती रस्त्याच्या एका बाजूस धाडदिशीं पडली. तिनें उठण्याचा यत्न केला, पण ती पुनः पडली. तिचे डोळे मिटले आणि 'आई, आई!' असे दोन शब्द तिच्या तोंडांतून निघाले, आणि मरणकाळची बेशुद्धि तिला आली.

इकडे सातारा शहरांत माचीचे पायथ्याशीं एका वाड्यासमोर एक मोतद्दार एक काळी घोडी एका गाडीला जुंपीत होता आणि एक पंधरासोळा वर्षांचा मुलगा देवडीवर आपला पोषाख चढवीत होता. त्याच्या समोरच्या ओटीवर त्या मुलाची आई हळदीकुंकवाची तयारी करीत बसली होती, व त्याचा बाप दुसऱ्या चौसोपींत आपल्या कामाचे कागदपत्र पहात बसला होता. इकडे त्या मुलाची तयारी झाली आणि त्यानें खुंटीवरचा चाबूक हातांत घेतला. इतक्यांत त्याचीं धाकटीं भावंडें त्यास म्हणालीं, "भाऊ, भाऊ, तूं मावशीला आणण्यास वडूथास चाललास काय रे ?" भाऊ म्हणाला, "हो, हा मी निघालोंच पाहा." भाऊच्या आईनें ते शब्द ऐकले आणि ती म्हणाली, "भाऊ, आतां संध्याकाळ होत आली आहे, आणि पाऊसही पडतो आहे. तर तूं जाऊं नको." भाऊ म्हणाला, "आई, तूं काळजी करूं नको. मी मावशीला अगदीं संभाळून घेऊन येईन." त्याची बहीण चिमणी म्हणाली, "आई जाऊं दे ग भाऊला. मावशी आली म्हणजे आम्ही झोंपाळ्यावर बसूं आणि गाणीं म्हणूं." राधाबाईनें आपल्या नवऱ्याच्या तोंडाकडे पाहिलें आणि विचारलें, "भाऊला जाउं दे का ?" रामदयाळ म्हणाले, "जाईना कां ? आपली घोडी हुशार आहे आणि भाऊ गाडी हाकण्यांत अगदीं तरबेज आहे." बापाच्या तोंडांतून हे शब्द निघतांच भाऊ तडक बाहेर पडला आणि त्यानें गाडी हांकली.

रामदयाळ तसाच कागद वाचीत बसला होता. इतक्यांत एक कागद हातांत घेऊन तो आपल्या बायकोस म्हणतो, "अग, ही पाहिलीस का आणखी एक नोटिस त्या रूपसिंगाच्या वार-

साच्या नांवानें आली आहे ? त्याच्या वारसाविषयीं मी पुष्कळ तपास केला. ते जर कोणी सांपडतील तर त्यांना बरीच जिंदगी मिळणार आहे.'' राधाबाई मोठ्या उत्कंठेनें म्हणाली, '' त्यांचा तपास लागावा, म्हणून मी तर नवस केला आहे. गरीब बिचारी चंद्राबाई कुठं आहे कोण जाणे ? तिचा कांहीं मागमूससुद्धां लागत नाहीं, हा मोठा चमत्कार आहे. आम्हीं कीं नाहीं, लहानपणीं अगदीं बहिणीप्रमाणं होतों. कसंही करा, पण हर-प्रयत्नानं त्यांचा तपास लावा बरं ! ''

''तूं कांहीं भिऊं नको.मी कसा ना कसा तरी त्यांचा तपास लावीनच लावीन.'' असें म्हणून तो आपल्या कामास लागला. दहापांच मिनिटें लोटलीं असतील नसतील, तों चिमणी घाबऱ्या घाबऱ्या धांवत आईकडे आली आणि आईला म्हणाली, ''आई, आई, भाऊ लागलाच परतला. तेव्हां कांहीं तरी गडबड आहे.'' इतक्यांत सर्व माणसें जोत्यावर जमलीं. गाडी दारापुढें येऊन थडकल्याबरोबर भाऊ कांहीं ओझें पोटाशीं धरून झटकन घरांत शिरला. त्याच्या बहिणीनें तें पाहिलें आणि ती म्हणाली, '' अरे भाऊ, ही तर कोणाची मुलगी आहे. '' '' मला ही मुलगी शहराबाहेर अर्ध्या मैलाच्या आंतच सांपडली. ती रस्त्यावर निश्चेष्ट पडली होती. तिला पाहिल्याबरोबर घोडी बुजली आणि माझ्या हातांतील रेन खेचतां खेचतां तुटली. शेवटी मी गाडींतून उडी टाकली व पाहतों तों ही मुलगी.आई,पण ती जगेलना ग !''

रामदयाळ यानें मुलीला त्याच्या हातांतून आपल्या हातीं घेऊन, तिला मऊ बिछान्यावर निजविलें, मग भराभर कोणी शेगडी पेटविली, कोणीं मात्रा उगाळून आणली, कोणी त्या

अमुलाचे हातपाय शेकले, अशी सारखी गडबड उडून राहिली. संक्रांतीच्या सणानिमित्त बायका हळदकुंकवाला जावयाच्या त्या तशाच राहिल्या आणि रामदयाळसिंगही कोठें बाहेर गेले नाहींत. याप्रमाणें एक तासभर मेहनत झाली, तेव्हां सुंदरेनें डोळे उघडले, आणि पाहते, तों आपण मोठ्या उंच पलंगावर निजलेली आहें. सभोंवतीं आरसे लागून गेले आहेत व चांदीच्या शामदानांतून मेणबत्त्या जळत आहेत. जिकडे तिकडे लखलखाट झाला आहे, व चांदीचें सामान व बिलोर झगझगत आहेत. तें पाहून तिच्या निस्तेज तोंडावर थोडी सुरखाई आली आणि ती मोठ्या प्रसन्न मुद्रेनें म्हणाली, "खरोखरच स्वर्ग लोक तो हाच होय. पण इथं माझी आई मला कुठं भेटेल बरं?" हे शब्द ऐकून राधाबाईला रडूं आलें, आणि तिनें खालीं वांकून मोठ्या प्रेमानें सुंदरीच्या तोंडावरून हात फिरवून म्हटलें, "माझे बये! हा स्वर्गलोक नव्हे. तूं परक्या ठिकाणीं नाहींस बरं. आम्हीं तुला कांहीं कमी पडूं देणार नाहीं." हे शब्द ऐकून सुंदरा थोडीशी बुचकळ्यासारखी झाली, आणि एक क्षणभर निमूटपणें विचार करीत राहिली. मग ती अंथरुणावरून उठावयास लागली, आणि म्हणाली, "मला इथून पुढं सासऱ्याला जायचं आहे, व तिथं रामदयाळसिंग यांची भेट घ्यायची आहे." हें ऐकून राधाबाई म्हणाली, "मुली, ज्यांच्याकडे तूं जाणार होतीस त्यांचंच घर हो हें. आम्ही उभयतां तुझ्याजवळ बसलों आहों. तूं आम्हांला भेटायला येणार होतीस?" सुंदरेची मुद्रा पहिल्यापेक्षां सुप्रसन्न झाली, आणि डोळे पुसून ती न्याहाळून पाहून म्हणाली, "राधाबाई त्या

BVBK-0402416